# सर्वश्रेष्ठ दान, मरणोत्तर देहदान

**१) देहदान :–** जीवनात आपण आपल्या स्वच्छेने विविध दान देतो. ज्याप्रकारे रक्तदान मृतवत शरीरामध्ये प्राण संचारण्याचे काम करते त्याप्रकारे देहदान हे वैद्यकीय अध्ययन व संशोधनासाठी जीवनदायी महादान ठरते. आज देहदान ही बदलत्या काळाची गरज आहे. सर्व दानापेक्षा ''मरणोत्तर देहदान'' हे सर्वश्रेष्ठ समजले जाते कारण ते एक नव्या युगाचे पवित्र पुण्यकर्म आहे. मृत्युनंतर आपले शरीर दान करण्याची इच्छा संकल्पीत करणे व ती नातेवाईकांकडून पूर्ण करून घेण्याची व्यवस्था करून ठेवणे म्हणजेच देहदान होय.

**२) वयोमर्यादा :–** १८ वर्षापुढील सर्व स्त्री व पुरूष कायद्याने मृत्यूनंतर देहदान करू शकतात. त्यासाठी जात/धर्म असा कोणताही भेद नाही. मृत्यूनंतर देहदान करण्या बद्दलच्या कायद्याच्या सर्व तरतुदी "Bombay Anatomy Act" मध्ये नमुद केलेल्या आहेत.

**३)** म.वि.प्र. समाजाचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयातील **शरीररचनाशास्त्र विभागात** सन १९९१ पासून देहदान स्विकारण्याची प्रक्रिया राबविली जाते.

**४) देहदानासाठी नोंदणी –**

अ) ज्या व्यक्तिस मृत्युनंतर देहदान करण्याची इच्छा असेल त्यांना मराठा विद्या प्रसारक समाजाच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, शरीररचनाशास्त्र (Anatomy) विभागात नोंदणी करावी लागते. त्यासाठी

i) स्वसाक्षरीत भरलेले देहदान इच्छा पत्र (Declaration Form for Body Donation) व

ii) दोन साक्षीदारासमक्ष भरलेले जवळच्या नातेवाईकांचे संमतीपत्र,

iii) दोन पासपोर्ट फोटोसह **शरीररचनाशास्त्र** विभागात जमा करावे लागते.

**देहदान इच्छा पत्र विभागामध्ये विनामुल्य मिळते.**

ब) शरीररचनाशास्त्र विभागामार्फत आपणास देहदान नोंदणीपत्र (Body Donation Registration Card) दिले जाईल.

क) नोंदणी न करता मृत्यूशय्येवर जर एखाद्या व्यक्तिने देहदानाची इच्छा व्यक्त केली व त्या व्यक्तिचा मृत्यू नोंदणी करायच्या अगोदर झाला, तरीही देहदान स्विकारले जाते. त्यासाठी फक्त मृतांच्या नातेवाईकांचे प्रतिज्ञापत्र व संमतीपत्र लागते.

**५) देहदानाची पध्दत –**

अ) नैसर्गिक मृत्युनंतर ४ ते ६ तासांच्या आत मृतदेह वैद्यकीय महाविद्यालय, आडगांव, नाशिक येथे आणण्याची व्यवस्था महानगरपालिका हद्दीत शरीररचनाशास्त्र विभागातर्फे करण्यात येते.

ब) मृतदेह आणतांना देहदान नोंदणीपत्र व डॉक्टरांनी दिलेली विहीत नमुन्यातील मृत्युचा दाखला (Death Certificate) घेऊन येणे बंधनकारक आहे. त्याशिवाय ''देहदान'' स्विकारला जात नाही.

क) देहदान स्विकारल्यानंतर पोचपावती व प्रमाणपत्र देण्यात येईल, ते पोचपावती व प्रमाणपत्र १० दिवसाच्या आत महानगरपालिकेत नोंदविणे बंधनकारक राहील.

ड) मृतदेहास अत्यंत सन्मानाने वागविले जाईल याचा ग्वाही नातेवाईकांना दिली जाते.

**६)** देहाची कोणत्याही प्रकारे विटंबना होणार नाही याची काळजी घेतली जाते आणि तो मृतदेह वैद्यकीय शिक्षणासाठी व संशोधनासाठी वापरण्यात येतो.

**७)** ज्या वैद्यकीय महाविद्यालयात देहदान नोंदणी अर्ज नोंदविला असेल तेथे देह नेऊनदेणे सोईचे असते, परंतु काही अपरिहार्य कारणास्तव अन्य ठिकाणी मृत्यु झाल्यास जवळच्या कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात देहदान करता येते.

## ८) देहदान केलेल्या देहाचा उपयोग खालील कारणासाठी केला जातो.

अ) वैद्यकीय विद्यार्थ्यांना मानवी शरीराच्या रचनेचा (उदा. त्वचा, स्नायु रक्तवाहिण्या, मज्जातंत हाडांची व इतर अवयवाची ठेवण) शास्त्रोक्तपध्द्तीने अभ्यास करण्यासाठी.

ब) विविध वैद्यकीय कार्यशाळासाठी (Workshops & CME),

क) पद्व्युत्तर संशोधनासाठी,

ड) जीवंत देहावर न करतायेणाऱ्या विविध शस्त्रक्रिया शिकण्यासाठी (Operations) व वैद्यकीय उपचाराच्या अध्यनासाठी

इ) शल्य चिकित्सकांना दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy) व शस्त्रक्रियेतील गुंतागुंतीवर मात करण्याच्या प्रशिक्षणासाठी

ई) वैद्यकीय महाविद्यालयातील संग्रहालयासाठी (Museum)

**९)** सर्वसाधारणपणे नैसर्गिक मृत्युचा दाखला डॉक्टरांनी दिल्यावर देह स्विकारला जातो. परंतु खालील अवस्थेत मृतदेह स्विकारले जात नाहीत.

अ) अपघात झालेले, शव-विच्छेदन (Post Mortem) केलेले.

ब) सांसर्गिक रोगाने मृत झालेला देह. उदा. एड्स, कावील, कॉलरा, गॅंगरीन वगैरे.

क) मृत्यूनंतर ६ तासांनी आलेला मृतदेह.

**१०)** दिर्घकाळ आजारी असलेल्या व्यक्तींचा देह लवकर कुजु लागतो त्यामुळे डॉक्टरांच्या मताप्रमाणे त्यावर लगेचच अत्यंसंस्कार होणे आवश्यक असते अशा देहाचे देहदान करू नये.

**देहदानाचे पुण्यकर्म करून वैद्यकीय शिक्षण व संशोधनात मोलाचा वाटा उचलणाऱ्या देहदात्याचे मन:पुर्वक आभार.**

देहदानासाठी माहितीसाठी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

| अ.नं. | संपर्कासाठी फोन नंबर | विस्तारीत क्र. |
|---|---|---|
| ०१ | ०२५३-२३०३८०२ | |
| ०२ | ०२५३-२३०३९२३ | १२९१ |
| ०३ | ०२५३-२३०३९२५ | |
| ०४ | ०२५३-२३०३१११ | |

विभाग प्रमुख
शरीररचना शास्त्र विभाग
डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय,
आडगांव, नाशिक-३.

टिप : १. देहदान झाल्यानंतर नातेवाईकांनी मृत्युचा दाखला महानगरपालिकेकडुन १० ते १५ दिवसांच्या आत घेने बंधनकारक राहील.

२. अवयवदान किंवा नेत्रदानासाठी वेगळा फॉर्म भरणे गरजेचे आहे.

# – संमतीपत्र –

आम्ही खालील सही करणार प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की, माझे वडील / आई / ____________________

/ नाव कै. ______________________________________________ यांचे दि.      /      /

वाजता ____________ रोजी दुख:द निधन झाले.

त्यांचे अंतिम इच्छे नुसार सदरचा मृतदेह वैद्यकिय शिक्षणासाठी डॉ. वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय व संशोधन केंद्र शरीररचनाशास्त्र विभागात सुर्पुद करीत आहोत. भविष्यात या देहदानाबाबत तक्रार रहाणार नाही, व त्याचप्रमाणे कुणी आक्षेप घेतल्यास सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. त्याचप्रमाणे मृत्युनोंदणी महानगरपालिका/नगरपालिका/ग्रामपंचायत कार्यालयात नोंदणी करण्याची जबाबदारी सर्वस्वी आमची राहीन, असे आम्ही लिहून देत आहोत.

| **वारसदार** | **नाव / सही    नाते** | **पत्ता** | **दुरध्वनी क्र.** |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय आणि संशोधन केंद्र

वसंतदादा नगर, आडगांव, नाशिक ४२२ ००३.
फोन नं. ०२५३-२३०३८०२, २३०३९३० विस्तारीत क्र. -१२९१

## शरीररचनाशास्त्र विभाग

## सर्वश्रेष्ठ दान मरणोत्तर देहदान

नांव : ____________________

जन्मतारीख व सध्याचे वय : ____________________

पत्ता : ____________________

____________________

दुरध्वनी क्र. : ____________________

जन्म खुण : ____________________

प्रति,
विभाग प्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग
म.वि.प्र.समाजाचे डॉ.वसंतराव पवार
वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, आडगांव,
नाशिक-३.

**विषय : मरणोत्तर देहदान करण्याचे इच्छापत्र**

मा. महोदय,

माझा मृतदेह मृत्यूनंतर वैद्यकीय शिक्षणासाठी व संशोधनासाठी आपल्या विभागात दान करण्याची माझी इच्छा आहे तरी त्याकरिता माझी नोंदणी करून घ्यावी ही नम्र विनंती.

धन्यवाद !

आपला / आपली विश्वासु

सही

नांव ____________________

**<u>जवळच्या नातेवाईकांचे देहदान करण्याबाबत संमतीपत्र</u>**

श्री./श्रीमती ____________________

वय ............. वर्ष यांच्या मृत्युनंतर देहदान वैद्यकीय शिक्षणासाठी , शरीररचनाशास्त्र विभाग, म.वि.प्र. समाजाचे डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय आणि संशोधन केंद्र, आडगांव, नाशिक ४२२ ००३ या संस्थेला दान करण्यास आमचा कोणताही आक्षेप नाही.

| नांव | देहदान कर्त्यांशी नाते | संपर्क | सही |
|---|---|---|---|
| १) | | | |
| २) | | | |
| ३) | | | |

**✻ सुचना : जवळचे नातवाईक म्हणजे आई-वडील, पती-पत्नी, भाऊ-बहिण, मुलगा, मुलगी किंवा इतर नामनिर्देशीत व्यक्ती.**

साक्षीदाराची सही : १) ____________________ साक्षीदाराची सही :२) ____________________

नांव : ____________________ नांव: ____________________

संपर्क : ____________________ संपर्क : ____________________

**✻ कृपया ओळखपत्रासाठी स्टॅम्प आकाराचा फोटो या अर्जाबरोबर पाठवावा.**

**<u>FOR OFFICE USE</u>**

Body Donate Registration No. ____________________ of ____________________

Date of Receipt of form ____________________ Date of acknowledgment____________________